महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२१/प्र.क.५१/२०२३/एक दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०२३

## सेवानिवृत्त अवर सचिव/कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लिपिक टंकलेखक यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागातील अवर सचिव/कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लिपिक टंकलेखक या पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची ०१ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | १ |
| २ | सहायक कक्ष अधिकारी | २ |
| ३ | लिपिक टंकलेखक | १ |

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती प्रथमत: ०१ वर्षाच्या कालावधीकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण-२७१५/प्र. क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३,दिनांक ०८ सप्टेंबर, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार शासनाच्या किंवा आयोगाच्या कार्यालयातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असावेत.

३) उमेदवार आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागातील सरळसेवेने पदभरती कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेला सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६२ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक अधिकारी/अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने त्यांचे अर्ज so-establishment@mpsc.gov.in या मेल आयडीवर अथवा सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशूल गोल्ड फिल्ड नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत

करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-६९३८५९५७/०२२-६९३८५९५४ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) आवश्यक असलेली अर्हता/अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाच्या कार्यालयाचा राहिल.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई येथील कार्यालयात काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त अवर सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी/लिपिक टंकलेखक यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :-.........................................................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.........................................................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-.........................................................................................................

४) भ्रमणध्वनी क्रंमाक :-.........................................................................................................

५) जन्म दिनांक व वय :-.........................................................................................................

६) संबंधित पदाकरीता आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/ नाही

७) अनुभव :-.........................................................................................................

आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागात सरळसेवेने पदभरती संदर्भातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अवर सचिव/कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लिपिक टंकलेखक यांची १ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची जाहिरात/ सूचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी